Exh. 19

रे. क. नं. ११/२०२६

राधानगरी येथील मे. दिवाणी न्यायाधिशसो

यांचे कोर्टात.................

प्रविण ढवण ... **वादी**

विरुध्द

श्री. प्रल्हाद बाबुराव ढवण वगैरे ... **प्रतिवादी**

Order-
Read and recorded.
Sd/-
Jt. C.J.J.D.,Radhanagari.
Dt. 13-3-2026

**यातिल प्रतिवादी नं. १ ते ३ तर्फे दाव्यास कैफियत व मनाई अर्जास म्हणणे खालील प्रमाणे,**

१) वादीचा दावा व मनाई अर्ज साफ खोटा व चुकीचा असून सदरील दाव्यातील व मनाई अर्जातील मजकूर प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. तसेच वादीचा दावा कायद्यातील तरतुदी प्रमाणे आहे त्या स्वरुपात चालणेस पात्र नाही. सबब वादीचा दावा व मनाई अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

२) दावा व मनाई अर्जी कलम १(अ) व १(ब) या मिळकती प्र. वादी क्र. १ ते ३ यांच्या वडीलोपार्जीत मालकीच्या मिळकती असुन सदरील मिळकतीशी यातील वादी यांचा कांहीही संबंध नाही. तसेच सदरील मिळकतीमध्ये वादी यांची शांततामय कब्जेवहीवाट असुन सदरील मिळकतीमध्ये प्र.वादी क्र. १ ते ३ व प्र.वादी क्र. १ ते ३ यांचे कुटुंबिय आपले सोईनुसार पिके घेतात.

३) तसेच यातील वादी यांनी सदरील दाव्यामध्ये दावा मिळकत गट क्र. ५०६ मधील वादी क्र. १ व २ यांच्या वैशाली नामदेव ढवण व अंजना नामदेव ढवण या

Assistant Suprintendent

दोन आई व प्रतीभा योगेश पारकर व तणुश्री तुषार मुद्रास या दोन बहीणींना तसेच इतर हक्कातील सुमन महादेव बिल्ले यांना आवश्यक पक्षकार केलेले नाही. तसेच गट क्र. ५०७ मधील वादी क्र.३ ते ५ यांच्या बहीणी सोनाबाई धोंडीराम कोरगावकर, यशोदाबाई नरहरी नार्वेकर, वत्सला आत्माराम ढवण यांना आवश्यक पक्षकार केलेले नाही. त्याकारणाने वादीचे सदरील दाव्यास नॉन जॉईडर ऑफ नेससरीज पार्टीज या तत्वाचा बाध येत असलेने वादीचा दावा व मनाई अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

४) तसेच वादीच्या सदरील दाव्यास लिमीटेशन ॲक्ट मधील तरतुदींची बाधा येत असलेने वादीचा दावा व मनाई अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा

५) तसेच वादीचे सदरील दाव्यास THE BOMBAY PREVENTION OF FRAGMENTATION AND CONSOLIDATION ACT 1947 मधील तरतुदींची बाधा येत असलेने वादीचा दावा व मनाई अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा

६) तसेच दावा व मनाई अर्जी कलम १(अ) व १(ब) या मिळ्कतीबाबत यातील प्र. वादी क्र. १ ते ३ यांनी यातील वादी क्र.३ ते ५ व अन्य यांचेविरुध्द मे. कोर्टामध्ये रे.क.नं.१९५/२०२५ चा दावा कायम मनाई ताकीद होवुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. मे. कोर्टामधील रे.क.नं. १९५/२०२५ या दाव्यामध्ये यातील वादी क्र. ३ ते ५ हे हजर झालेले आहेत. तरीदेखिल यातील वादी यांनी सदरील दावा दाखल करतांना मे. कोर्टामधील रे.क.नं.१९५/२०२५ या दाव्याबाबतची माहीती लपवुन ठेवुन वादी यांनी सदरचा साफ खोटा दावा दाखल केलेला आहे. त्याकारणाने वादीचा सदरचा दावा व मनाई अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

७) दावा व मनाई अर्जी कलम (२) मधील वादीनी नमुद केलेली वंशावळ अपुर्ण नमुद कलेली आहे.

८) दावा व मनाई अर्जी कलम (३) मधील वादीनी कथन केलेला वादी व प्रतिवादी यांचे पूर्वहक्कदार बजाप्पा यांना गणू व गोविंदा अशी दोन मुले होती. ते दोघेही मयत आहेत. गणू यांना शंकर,गंगाराम व आत्माराम ही तिन मुले होती ते सर्व मयत आहेत. शंकर यांना दिनकर,विलास व महादेव ही तिन मुले होती.त्यापैकी

Assistant Suprintendent

दिनकर व महादेव हे मयत आहेत. दिनकर यांना अशोक व प्रकाश ही दोन मुले आहेत.महादेव यांना कोणीही वारस नाही. हा मजकुर सर्वसाधारण बरोबर असुन गंगाराम मयत असून त्यांना मुलगा नामदेव तसेच मुलगी सुमन महादेव बिल्ले ही असुन सदरील मुलगीस या कामी आवश्यक पक्षकार केलेले नाही. नामदेव यांच्या दोन पत्नीना व दोन मुलींना या कामी वादी यांनी आवश्यक पक्षकार केलेले नाही. आत्माराम मयत असून त्यांना वारस एकनाथ, दामोदर व बळवंत ही मुले तसेच सोनाबाई धोंडीराम कोरगावकर, यशोदाबाई नरहरी नार्वेकर,वत्सला आत्माराम ढवण या मुली आहेत. सदरील सोनाबाई धोंडीराम कोरगावकर, यशोदाबाई नरहरी नार्वेकर, वत्सला आत्माराम ढवण यांना या कामी आवश्यक पक्षकार केलेले नाही. तसेच गोविंदा हे मयत असून त्यांना वारस भाउ, दत्तात्रय व बाबूराव अशी तीन मुले होती. भाऊ हे मयत असून त्यांना वारस गणपती, तानाजी, तुकाराम, श्रीकांत व जयसिंग अशी मुले होती. त्यापैकी गणपती हयात असून बाकी सर्व मयत आहेत. दत्तात्रय मयत असून त्यांना वारस आनंदा आहे. व बाबूराव मयत असून त्यांना वारस प्र. वादी क्र. १ ते ३ प्रल्हाद,रमेश व सुरेश अशी मुले आहेत.

९) दावा व मनाई अर्जी कलम (४) मधील वादीनी कथन केलेला मजकुर सर्वसाधारण बरोबर आहे.

१०) दावा व मनाई अर्जी कलम (५) मधील वादीनी कथन केलेला मजकुर साफ खोटा व चुकीचा असुन सदरील मजकुर प्र. वादी यांना मान्य व कबुल नाही. तुकडे बंदी व तुकडे जोड या स्किमची अमलबजावणी करत असताना त्यावेळी एकत्रीकरण स्किमचे संबंधीत अधिकारी यांनी संबंधीत जमिनींचे मालक यांचे प्रत्यक्ष जागेवर जावुन जमिनीचे मालकी कब्जेवहीवाटीची चौकशी करुन कागदपत्रे पाहुन तसेच संबंधीतांचे जाबजबाब घेवुन तसेच चौकशी करुन संबंधीतांचे हिस्सेप्रमाणेची नोंद कागदोपत्री करुन ७/१२ उतारे तयार करुन संबंधीत मालकी वहीवाटीचे क्षेत्र संबंधीत मालकांचे कब्जेवहीवाटीत दिलेले आहे. त्यावेळेपासुन दावा मिळकत गट क्र. ५०२ व ५०३ या मिळकतीचे ७/१२ पत्रकी यातील प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे पुर्वहक्कदार यांचे नावाची नोंद सदरील मिळकतीचे ७/१२ पत्रकी मालक व कब्जेदार म्हणुन झालेली असुन सदरील मिळकतीमध्ये प्र.वादी क्र. १ ते ३ यांची त्यांचे पुर्वहक्कदारांचेपासुन आजअखेर शांततामय कब्जेवहीवाट होती व आहे. यातील

Assistant Suprintendent

प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे पुर्वहक्कदार याती गट क्र. ५०२ व ५०३ या मिळकती वादीचे पूर्वहक्कदारांना कधीही दिलेल्या नाहीत.

११) तसेच प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे पुर्वहक्कदारांनी सदरील गट क्र. ५०२ व ५०३ या मिळकतीमध्ये वादी यांचे पुर्वहक्कदारांची मालकी वहिवाट असणार आहे असा जबाब कधिही दिलेला नाही. दावा मिळकत मौजे नरतवडे येथिल गट नं. ५०२,५०३,५०४ या मिळकतीशी यातील वादी अगर वादी यांचे पुर्वहक्कदारांचा यांचा कोणताही संबंध नाही.त्याकारणाने मौजे नरतवडे येथिल गट नं.५०२,५०३,५०४ या मिळकतीना यातील वादीचे पूर्वहक्कदार यांची नावे नमूद होणेचा प्रश्नच येत नाही. एकत्रीकरण चे अधिकारी यांनी कोणतीही चुक केलेली नाही. मौजे नरतवडे येथिल गट नं.५०२,५०३ या मिळकतीचे ७/१२ पत्रकी प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे पुर्वहक्कदारंचे नावाची झालेली नोंद कायदेशिर व बरोबर असुन प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे वडील मयत झालेनंतर वारसा हक्काने सदरील मिळकतीचे ७/१२ पत्रकी प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे नावाची नोंद झालेली आहे. तसेच सदरील मिळकतीमध्ये प्र. वादी क्र. १ ते ३ हे त्यांचे पुर्वहक्कदारांचे पासुन आजअखेर आपले कुटुंबियांचे साहयाने मालकी हक्काने पिके घेत आहेत.

१२) तसेच प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे पुर्वहक्कदारांनी एकत्रीकरण अधिकारी यांचे समोर मौजे नरतवडे येथिल गट नं.५०२,५०३ या जमिनी वादी यांचे नावे होणेबाबत जबाब दिलेले नसलेने त्याच दिवशी जमीनीची अदलाबदल होणेचा प्रश्नच येत नाही. मौजे नरतवडे येथिल गट नं.५०२,५०३ या मिळकतीशी वादी अगर वादीचे पुर्वहक्कदार यांचा कांहींही संबंध नसलेने मुंबई तुकडे बंदी तुकडे जोड कायदयातील कलम २४ नुसार त्याच दिवशी वादीचे पूर्वहक्कदार हे गट नं. ५०२,५०३ व ५०४ या मिळकतीचे मालक होणेचा प्रश्नच येत नाही. तसेच वादी यांचे पुर्वहक्कदारांचा मौजे नरतवडे येथिल गट नं.५०२,५०३ या मिळकतीशी कांहींही संबंध नाही. त्याकारणाने वादीचे पुर्वहक्कदार यांनी त्यांच्या हयातीमध्ये दावा जमीनीमध्ये उस,भात अशी पिके घेणेचा प्रश्नच येत नाही. तसेच तो उस त्यांच्या इतर जमीनी गट नं. ५०५,५०६,५०७ या नंबरवर कारखान्यावर गाळपासाठी पाठविणेचा प्रश्नच येत नाही. तसेच मौजे नरतवडे येथिल गट नं.५०२ व ५०३ या मिळकतीमध्ये वादीचे पुर्वहक्कदार यांनी भाताचे अगर कोणतेही पिक घेणेचा प्रश्नच

Assistant Suprintendent

येत नाही. वादीचे पुर्वहक्कदार मयत झालेनंतर वारसांने गट क्र. ५०२ व ५०३ या मिळ्कतीमध्ये वादीना मालकी हक्क प्राप्त झालेले नाहीत. तसेच वादी यांची मौजे नरतवडे येथिल गट नं.५०२ व ५०३ या मिळ्कतीमध्ये त्यांचे पुर्वहक्कदारांचे पासुन सन १९६६ पासून अगर कधिही कब्जेवहीवाट वहती व नाही. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे पूर्वहक्कदार यांनी सन १९७६ व १९८० साली गाव कामगार तलाठी यांचेकडे अर्ज दिलेला नसलेने वादीच्या पूर्वहक्कदारांची नावे लागणेबातत मागणी करणेचा प्रश्नच येत नाही. तसेच गाव कामगार तलाठी यांनी एकत्रीकरणातील चुक असलेमुळे सक्षम अधिकायाकडे अर्ज करणेस सांगणेचा प्रश्नच येत नाही.

१३) दावा व मनाई अर्जी कलम (६) मधील वादीनी कथन केलेला मजकुर साफ खोटा व चुकीचा असुन सदरील मजकुर प्र. वादी यांना मान्य व कबुल नाही. दावा मिळ्कत गट क्र. ५०२ व ५०३ या मिळ्कतीशी यातील वादी यांचा कांहीही संबंध नाही. दावा मिळ्कत गट क्र. ५०२ व ५०३ या मिळ्कतीमध्ये यातील प्र. वादी क्र. १ ते ३ यांची मालकी व कब्जेवहीवाट प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे पुर्वहक्कदारंचेपासुन आजतागायत आहे. यातील वादी क्र. ३ ते ५ यांनी व जयवंत जोतीराम कुंभार यांनी दावा मिळ्कत गट क्र. ५०२ व ५०३ या मिळ्कतीमधील प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे शांततामय कब्जेवहीवाटीस ता.०९/११/२०२५ इ. रोजी हरकत व अडथळा केलेने यातील प्र. वादी क्र. १ ते ३ यांनी मे. कोर्टामध्ये रे.क. नं. १९५/२०२५ चा दावा दाखल केलेला आहे. सदरील दाव्यामध्ये यातील वादी क्र.३ ते ५ हे हजर झालेनंतर यातील वादी क्र. १ ते ८ यांनी एकमेकाबरोबर संगनमत करुन प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे मालकीची दावा मिळ्कत गट क्र. ५०२ व ५०३ या दोन्ही मिळ्कती हडपणेच्या दुष्ट हेतुने सदारील दावा दाखल केलेला आहे. त्याकारणाने वादीचा दावा व मनाई अर्ज नामंजुर करणेत यावा. दावा जमीन गट क्र. ५०२ व ५०३ या मिळ्कतीमध्ये वादीची कधिही मालकी वहिवाट नाही. त्याकारणाने प्रतिवादी नं. १ ते ३ यांनी दि. ३०/१२/२०२५ रोजी गट नं. ५०२ व ५०३ मध्ये भाताचे पिक कापल्यानंतर दावा जमीनीत घुसण्याची धमकी बळवंत आत्माराम ढवण यांना देणेचा प्रश्नच येत नाही. तसेच त्यांनी राधानगरी पोलीस स्टेशनला प्रतिवादी नं. १ ते ३ यांचे विरुध्द साफ खोटी तक्रार दिलेली आहे. तसेच दावा मिळ्कत गट क्र. ५०२ व ५०३ या मिळ्कतीशी यातील वादी यांचा कांहीही संबंध नसलेने ता. ३०/१२/२०२५ रोजी दाा मिळ्कतीत गट क्र. ५०२ व

Assistant Suprintendent

५०३ या मिळकतीमध्ये वादी येणेचा प्रश्नच येत नाही. तसेच सदरील गट क्र. ५०२ व५०३ या मिळकतीमध्ये वादी यांची कब्जेवहीवाट नसलेने वादीचे तथाकथित कब्जेवहीवाटीस हरकत व अडथळा करणेचा प्रश्नच येत नाही. दावा मिळकत गट क्र. ५०२ व ५०३ या मिळकतीचे प्र. वादी क्र. १ ते ३ हे मालक व कब्जेदार आहेत. त्याकारणाने दावा मिळकत गट क्र. ५०२ व ५०३ या मिळकतीचे वादी हे मालक असणेचा अगर त्यासंबंधी दाद मागणेचा वादी यांना कोणताही कायदेशिर हक्क व अधिकार नाही. तसेच दावा मिळकत गट क्र. ५०२ व ५०३ या दोन्ही मिळकतीचे मालकी वहीवाटीशी यातील वादी यांचा कांहीही संबंध नसलेने वादी यांना प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे विरुध्द मनाई ताकीदीची दाद मागणेचा कोणताही हक्क व अधिकार नाही. सदरील दावा दाखल करणेस वादी याला कोणतेही कारण घडलेले नाही. प्र. वादी क्र. १ ते ३ यांना व त्यांचे कुटुंबियांना त्रास व्हावा या दृष्ट हेतुने वादी यांने सदरचा दावा दाखल केला असलेने वादीचा दावा व मनाई अर्ज खर्चासह नामंजुर होणेस पात्र आहे.

१४) दावा अर्जी कलम ७ मध्ये नमुद केलेले दावेचे कारण साफ खोटे व लबाडीचे आहे जे कारण नमुद केलेले आहे ते काल्पनिक आहे. सदरील दावा दाखल करणेस यातील वादीना कोणतेही कारण घडलेले नाही. याही कारणास्तव वादीचा दावा खर्चासह नांमजूर होणेस पात्र आहे.

१५) वादी यांनी दावा मिळकतीची योग्य ती आकारणी केलेली नसलेने वादीचा दावा व मनाई अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे.

१६) तसेच दावा गट क्र. ५०२ व ५०३ या मिळकतीबाबत मे. कोर्टात रे.क.नं. १९५/२०२५ चा दावा प्रलंबित असलेची संपुर्ण माहीती वादी यांना असतांना देखिल वादी यांनी मे. कोर्टामध्ये सदरील बाब लपुवुन ठेवुन वादी यांनी प्र. वादी यांचे विरुध्द सदरचा साफ खोटा व चुकीचा दावा दाखल केलेला आहे. त्याकारणाने वादीच्या सदरील दाव्यास सप्रेशन ऑफ मटेरियल फॅक्टस या तत्वाची बाधा येत असलेने व वादी मे. कोर्टात स्वच्छ हाताने आला नसलेने देखील वादीचा दावा व मनाई अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा.

Assistant Supzintendent.

१७) वादी क्र. १ हा सरपंच आहे. सदरील वादी क्र. १ यांने भरमसाठ पैसा कमविलेला आहे. तसेच वादी क्र. १ हा आपले पदाचा व राजकीय वरदहस्ताचा दुरुपयोग करुन प्र. वादी क्र. १ ते ३ यांना निष्कारण त्रास देवुन प्र.वादी क्र. १ ते ३ यांचेवर व कुटुंबियांचेवर खोटया केसेस दाखल करीत आहे.

१८) तसेच वादीकडे भरपुर पैसा असुन वादी हे खेकटेखोर इसम आहे केवळ प्र. वादींना त्रास देणेच्या दृष्ट हेतुने वादीने प्र. वादी विरुध्द सदरचा दावा दाखल केलेला असलेने सदरचा दावा व मनाई अर्ज नामंजुर करणेत यावा. तसेच वादी यांनी सदरील साफ खोटा दावा प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे विरुध्द दाखल करुन वादी यानी प्र. वादी क्र. १ ते ३ यांना मानसिक व शारीरीक त्रास दिला असलेने वादी कडुन प्र. वादी क्र. १ ते ३ यांना प्रत्येकी र.रु.२५,०००/- कॉपेसेटरी कॉस्ट मिळणे आवश्यक व आगत्याचे आहे.

१९) सदरील कामी प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे विरुध्द मनाई आदेश न झालेस यातील वादी यांचे कांहींही नुकसान होणेचा संभव देखील नाही.

२०) याऊलट सदरील कामी प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे विरुध्द मनाई आदेश झालेस यातील प्र.वादी क्र. १ ते ३ यांचे अतोनात असे नुकसान होणार असुन वादी हे प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे दावा मिळ्कत गट क्र.५०२ व ५०३ मधील शांततामय कब्जेवहीवाटीस हरकत व अडथळा करणेची दाट शक्यता आहे. तशा प्रसंगी यातील प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे अतोनात असे नुकसान होणार असुन प्र. वादी क्र. १ ते ३ यांचे दावा मिळ्कतीमधील कायदेशिर हक्क डावलेले जाणार आहेत.

२१) वादीस सकृत दर्शनी केस नाही.

२२) बॅलन्स ऑफ कन्डीनीयन्स वादीचे बाजुने नसुन प्र. वादी यांचे बाजुने आहे.

**<u>२३) सबब प्र. वादी क्र. १ ते ३ यांची नम्र विनंती की,</u>**

अ) वादीचा दावा व मनाई अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

ब) यातील प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना वादी यांचेकडून प्रत्येकी र.रु. २५,०००/- कॉम्पेनसेटरी कॉस्ट मिळणेबाबत आदेश व्हावा.

Assistant Suprintendent

क) इतर न्यायाच्या अनुषंगीक दादी याच कामी व्हावेत.

ड) प्रतिवादींचा कोर्ट खर्च वादीकडुन वसुल होवुन मिळावा.

इ) जरुर तर कैफियत व म्हणणे दुरुस्त करणेस परवानगी असावी

----------------------

येणे प्रमाणे कैफियत व म्हणणे असे.

राधनगरी

ता. १३/०३/२०२६

प्रतिज्ञा

आम्ही यातील प्रतिवादी क्र. १ ते ३ सत्य शपथेवर प्रतिज्ञा करतो की, वरील कैफियत व म्हणण्यातील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुा राधानगरी

ता. १३/०३/२०२६

ॲफिडेव्हीट

मी यातील प्र. वादी **क्र. २ श्री. रमेश बाबुराव ढवण,** व.व. ५१, धंदा - शेती रा. मांगेवाडी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर, देवाचे शपथेवर ॲफिडेव्हीट करतो की,, देवाचे शपथेवर कथन करतो की, वरील कैफियत व म्हणण्यामधिल संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हीट आज मुा राधानगरी

ता. १३/०३/२०२६

**ॲफिडेव्हीट करणार यांना मी ओळखतो.**

**(ॲड. एस.पी. वागवेकर)**

Assistant Superintendent.

## प्रतिज्ञा

मी यातील प्र.वादी **क्र. २ श्री. रमेश बाबुराव ढवण,** व.व. ५१, धंदा - शेती रा. मांगेवाडी, ता. राधानगरी, जि. कोल्हापूर, देवाचे शपथेवर प्रतिज्ञा करतो की, वरील कैफियत, म्हणणे व ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूती प्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली प्रतिज्ञा आज मुा राधानगरी

ता. १३/०३/२०२६

olemnly Affirmed before me by
Shri./Smt. Ramesh Baburao Dhavan
Age 51 Occu Agri
of Mangewadi Tal: Radhanagari
Who identified by Shri./Smt. S.P. Wadgaonkar
Adv. Whom I Know personally
Dated 13/3/2026

Assistant Superintendent